**मा. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुषंगाने महसूली अधिकारी व प्राधिकारी यांच्या समोर जमीन विषयक अधिनियमाखाली चालणा-या अर्ध-न्यायिक प्रकरणांच्या संदर्भातील स्थगिती आदेशाच्या बाबतीत मार्गदर्शनात्मक दिशानिर्देश...**

**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग**
**शासन परिपत्रक क्रमांकः संकिर्ण- २०२१/प्र.क्र.१५/ज-१ अ**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक: ०६ मे, २०२१

**<u>संदर्भ :</u>-** शासन परिपत्रक क्रमांक आरईव्ही-१०९३/३५४/प्र.क्र.४/ल-२, दिनांक २४ ऑगस्ट,१९९३

**<u>शासन परिपत्रक</u>-**

मा.सर्वोच्च न्यायालयाने MISCELLANEOUS APPLICATION NO.१५७७ CF २०२० IN CRIMINAL APPEAL NOS.1375-76 OF 2013 या प्रकरणात दि.१५ ऑक्टोबर, २०२० च्या आदेशान्वये असे आदेशित केले आहे की, *"कोणत्याही न्यायालयाने Civil /Criminal case मध्ये दिलेली अंतरिम स्थगितीची कालमर्यादा फक्त ६ महिन्यांपर्यंत राहील. मा.न्यायालयाने सबळ पुराव्याच्या आधारे अशी स्थगिती ६ महिन्यानंतर वाढविली असेल तरच दिलेली स्थगिती चालू राहील, अन्यथा सदरहु स्थगिती ६ महिन्याचा कालावधी संपल्यानंतर आपोआप व्यपगत होईल. तसेच, हे आदेश संपूर्ण देशाच्या कोणत्याही मा.न्यायालयाने दिलेल्या सर्व स्थगिती आदेशाला लागू राहतील"*, असेही सदर आदेशामध्ये नमूद केले आहे.

महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ मधील तरतूदीनुसार अथवा जमीनविषयक विविध अधिनियमांन्वये मा.मंत्री(महसूल), मा.राज्यमंत्री (महसूल), प्रधान सचिव (अ.व.रि.), क्षेत्रीय महसूली अधिकारी व प्राधिकारी, आणि महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरण यांच्या समोर वेळोवेळी अर्ध-न्यायिक प्रकरणांची सुनावणी आयोजित करण्यात येते.

या बाबी विचारात घेवून महसूली अधिकारी व प्राधिकारी यांच्या समोर जमीन विषयक अधिनियमाखाली चालणा-या अर्ध-न्यायिक प्रकरणांच्या संदर्भातील स्थगिती आदेशाच्या बाबतीत महसूली अधिकारी व प्राधिकारी यांना दिशानिर्देश देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

मा.सर्वोच्च न्यायालयाने MISCELLANEOUS APPLICATION NO.१५७७ CF २०२० IN CRIMINAL APPEAL NOS.1375-76 OF 2013 या प्रकरणात दि.१५ ऑक्टोबर, २०२० रोजी पारित केलेल्या आदेशाच्या (आदेशाची प्रत यासोबत जोडली आहे) अनुषंगाने, मा.मंत्री(महसूल), मा.राज्यमंत्री (महसूल), प्रधान सचिव (अ.व.रि.), क्षेत्रीय महसूली अधिकारी व प्राधिकारी, आणि महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरण यांच्या समोर चालणा-या अर्ध-न्यायिक/ न्यायिक प्रकरणांच्या



Scanned with OKEN Scanner

बाबतीत सर्व संबंधित महसूली अधिकारी व प्राधिकारी यांना याद्वारे पुढीलप्रमाणे दिशा निर्देश देण्यात येत आहेत:-

**(१)** मा.मंत्री (महसूल), मा.राज्यमंत्री (महसूल), प्रधान सचिव (अ.व.रि.), क्षेत्रीय महसूली अधिकारी व प्राधिकारी आणि महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरण यांच्या समोर चालणा-या अर्ध-न्यायिक (Quasi- Judicial)/ न्यायिक प्रकरणी ६ महिन्यांपेक्षा जास्त काळाकरीता स्थगिती दिलेल्या सर्व प्रकरणी मा.सर्वोच्च न्यायालयाने MISCELLANEOUS APPLICATION NO.१५७७ CF २०२० IN CRIMINAL APPEAL NOS.1375-76 OF 2013 या प्रकरणात दि.१५ ऑक्टोबर, २०२० रोजी दिलेल्या आदेशाप्रमाणे, सर्व संबंधितांनी योग्य ती कार्यवाही करावी कोणत्याही परिस्थितीत मा.सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाचा अवमान होणार नाही, याचीही दक्षता घ्यावी.

**(२)** उक्त नमूद कोणत्याही महसुली न्यायालयाने आणि महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरणाने दिलेली अंतरिम स्थगितीची कालमर्यादा फक्त ६ महिन्यांपर्यंत लागू राहील. महसुली न्यायालयाने सबळ कारणांच्या आधारे, अपवादात्मक परिस्थितीत अशी स्थगिती ६ महिन्यानंतर वाढविली असेल, तरच तत्पुर्वी दिलेली स्थगिती चालू राहील, अन्यथा सदरहु स्थगिती ६ महिन्याचा कालावधी संपल्यानंतर आपोआप व्यपगत होईल. तसेच, हे आदेश संपूर्ण राज्यातील कोणत्याही महसुली अथवा अन्य न्यायालयाने दिलेल्या सर्व स्थगिती आदेशाला लागू राहतील.

**०३.** सर्व विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी व क्षेत्रीय महसूली प्राधिकारी व अधिकारी यांनी या निर्देशांची तात्काळ अंमलबजावणी करावी.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेताक २०२१०५०६१६१३०२७५१९ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

**( रमेश चव्हाण )**
**सह सचिव, महसूल व वन विभाग**

**प्रत,**

१) मा.राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई,
२) मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मुख्यमंत्री सचिवालय, मंत्रालय, मुंबई,
३) मा. मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय,मुंबई-३२,
४) मा. राज्यमंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय,मुंबई-३२,



Scanned with OKEN Scanner

५) मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय,मुंबई-३२,
६) प्रधान सचिव, विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई,३२
७) महालेखापाल, लेखा व अनुज्ञेयता/लेखापरिक्षा, महाराष्ट्र राज्य, (१) मुंबई,
८) महालेखापाल, लेखा व अनुज्ञेयता/लेखापरिक्षा, महाराष्ट्र राज्य (२) नागपूर,
९) अपर मुख्य सचिव (महसूल) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय,मुंबई-३२,
१०) अपर मुख्य सचिव (महसूल) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय,मुंबई-३२,
११) प्रधान सचिव (अ.व.रि.) यांचे स्वीय सहायक, महसूल व वन विभाग,मंत्रालय,मुंबई-३२,
१२) प्रबंधक, महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरण, मुंबई
१३) सर्व विभागीय आयुक्त,
१४) सर्व अपर आयुक्त, विभागीय आयुक्तांचे कार्यालय,
१५) जमाबंदी आयुक्त व संचालक, भूमी अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे,
१६) सर्व उपसंचालक, भूमी अभिलेख,
१७) सर्व जिल्हाधिकारी /अपर जिल्हाधिकारी
१८) माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय,मुंबई-३२,
१९) सर्व उप विभागीय अधिकारी (प्रांत अधिकारी) / सर्व जिल्हा अधिक्षक, भूमी अभिलेख,
२०) सर्व तहसिलदार/ सर्व तालुका निरिक्षक, भूमी अभिलेख,
२१) सर्व सहसचिव /उपसचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय,मुंबई-३२,
२२) “ज" समूहातील सर्व कार्यासन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२,
२३) निवडनस्ती, कार्यासन-ज-१ अ, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.

*******



Scanned with OKEN Scanner